दैनिक

# श्रमिक लोकराज्य

नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली येथे वितरीत होणारे वृत्तपत्र

संपादक – डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव : 7875782377 कार्यकारी संपादक – वैजनाथ स्वामी

दैनिक । नांदेड । वर्ष ४ थे । अंक २०८ । मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ०४ । DAINIK SHRAMIK LOKRAJYA । किंमत २ रूपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in

## 'त्या' पाकिस्तानी महिलांना तुर्तास दिलासा

**नाशिक :** पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शहरातही पाकिस्तानी नागरिकत्व असलेल्या सहा महिला राहत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू



झाल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली आहे. भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडून जाण्याचे आदेश दिले आहेत. रविवारी (दि.२७) या आदेशाची मुदत संपली असून वैद्यकीय व्हिसावर आलेल्या नागरिकांना मंगळवारपर्यंत (दि.२९) मुदतवाढ दिली आहे. मात्र पर्यटन किंवा इतर कारणांनी अल्प कालावधीसाठी आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना तातडीने देश सोडण्याचे आदेश केंद्र शासनाने दिले.

शहरातही पाकिस्तानी नागरिकत्व असलेल्या सहा महिला अनेक वर्षांपासून राहत असल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र या महिलांकडे दिर्घकालीन कालावधीचा व्हिसा आहेत. एका महिलेने गत आठवड्यातच दोन वर्षांसाठी व्हिसाची मुदत वाढवल्याचे सुत्रांनी सांगितले. या सहाही महिलांचा विवाह झाला असून त्यांचे सासर नाशिकला असल्याने त्या अनेक वर्षांपासून शहरात वास्तव्यास आहेत. दिर्घकालीन व्हिसाची मुदत असलेल्या नागरिकांबाबत अद्याप ठोस आदेश किंवा सुचना न आल्याने त्यांच्यावर तुर्तास कोणतीही कारवाई होणार नसल्याचे पोलिस सुत्रांनी सांगितले. त्यामुळे शहरातील सहा महिलांना तुर्तास दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

### भारताचा पाकिस्तानला आणखी एक झटका

# पाकिस्तानी चॅनेल्सवर भारतात बंदी

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारतानं दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाया सुरू केल्या आहेत. तसंच दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानलाही भारतानं चांगलाच धडा शिकवला आहे. भारतातील पाकिस्तानी नागरिकांना हाकलून देण्यापासून ते थेट सिंधू जल करारापर्यंत असे अनेक निर्णय घेत भारतानं पाकिस्तानला धडा शिकवला. तरीही पाकिस्तान सुधारण्याचं नाव घेत नाही. अशातच आता भारत सरकारनं एक मोठा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तानी चॅनेल्सवर बंदी : पाकिस्तानी काही न्यूज चॅनेल्स तसंच युट्यूब चॅनेल्सवर भारतानं बंदी घातली आहे. गृह मंत्रालयाच्या शिफारशींनुसार, भारत सरकारनं डॉन न्यूज, समा टीव्ही, आर्य न्यूज, जिओ न्यूजसह 16 पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर बंदी घातली आहे. सांप्रदायिकदृष्ट्या प्रक्षोभक, खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती दाखवणे, भारतीय सैन्य आणि सुरक्षा एजन्सीविरूद्ध चुकीची माहिती प्रसारित करणे आदी कारणांमुळं ही बंदी घातली आहे.

माजी क्रिकेटर्सच्या युट्यूब चॅनेलवर बंदी : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर




भारताकडून पाकिस्तानविरोधात सतत कठोर निर्णय घेतले जात आहेत. भारत सरकारनं पाकिस्तानच्या अनेक युट्यूब चॅनेल्सवर बंदी आणली आहे. या चॅनल्समध्ये माजी क्रिकेटर शोएब अख्तर आणि आरजू काझमी यांसारख्या मोठमोठ्या युट्यूब चॅनल्सचाही समावेश आहे. त्याचसोबत प्रमुख मीडिया हाऊसच्या युट्यूब चॅनल्सवरही भारतात बंदी घातली आहे.

देशभरात संतापाची लाट : पहलगाममध्ये 22 एप्रिलला दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात 26 पर्यटक मारले गेले. एप्रिल आणि मे महिन्यात काश्मीरमध्ये असंख्य पर्यटक फिरायला जातात. याच गोष्टीचा फायदा घेत दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं. या घटनेवरून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळंच आता भारत सरकार पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी मोठमोठे निर्णय घेत आहे.

## 28 एप्रिल सेवा हक्क दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

नांदेड दि. 28 एप्रिल :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियानाला दशकपूर्ती झाल्यानिमित्त राज्य शासनामार्फत 28 एप्रिल हा दिवस जिल्हा व ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबवून साजरा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आज जिल्ह्यात सेवा हक्क दिवस तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 च्या दशकपूर्ती निमित्त ग्रामसभेमार्फत जनसहभागासह विविध उपक्रम राबविण्यात आले. नागरिकांमध्ये अधिनियम, राज्यसेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवाबाबत जनजागृती करण्यात आली.

जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्रामार्फत उत्कृष्ट सेवा देणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी व मुदखेड तालुक्यातील बारड येथील आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, व जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्रीमती मंजुषा जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अमित राठोड, विस्तार अधिकारी (पं) आर.एन. दमकोंडवार, व्ही. बी. कांबळे, आर. पी. केंद्रे, सरपंच श्रीमती संध्याताई विलास देशमुख, उपसरपंच श्रीमती अर्चना विश्वंभर हंबर्डे, विष्णुपूरी ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे, संगणक परिचालक उग्रसेन हंबर्डे, वसुली कारकून संतोष हंबर्डे, गावातील प्रतिष्ठीत नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवा हक्क दिनाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील उत्कृष्ट सेवा देणारे ग्रा. पं.विष्णुपुरी ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे, ग्रा. पं.बारड अनुप श्रीवास्तव, ग्रा.पं.माळकौठा संजय देशमुख, ग्रा.पं.उस्माननगर श्रीमती देवूबाई देशमुख, ग्रा. पं.लहानचे रवी क्षीरसागर यांना जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला.

## परोटी तांडा येथे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळयाचे भुमिपूजन

### राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची प्रमुख उपस्थिती




**सर्वप्रथम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सहस्त्रकुंड येथील महादेव मंदिराचे दर्शन घेऊन ट्रस्ट व ग्रामपंचायत वाळकीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील सरपंच, उपसरपंच, नाईक, कार्यकर्ते यासह समाजातील नागरिकांची उपस्थिती होती.**

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचा भुमिपूजन समारंभ कार्यक्रम किनवट तालुक्यातील परोटीतांडा येथे राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते आज करण्यात आला. यावेळी आमदार भीमराव केराम, आमदार बाबुराव कोहळीकर, श्रीमती बेबीताई प्रदीप नाईक, प्रफुल राठोड, डॉ. बेलखोडे, तहसीलदार श्रीमती शारदा चोंडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी परोटी तांडा व परिसरातील समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी दिले. परोटीतांडा येथील शाळेच्या मैदानावर राज्यमंत्री नाईक यांचा नागरी सत्कार करण्यात आला. आमदार केराम, आमदार कोहळीकर, श्रीमती नाईक यांनी नागरिकांच्या विविध समस्या सोडण्याबाबत विचार मांडले. प्रास्ताविक नारायण आडे यांनी केले. शेवटी आभार डॉ. मेरसिंग चव्हाण यांनी मानले.

## ऊसतोड कामगारांच्या समस्येवर चर्चा करण्यासाठी आढावा बैठक

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** ऊसतोड कामगारांच्या प्रलंबित विविध समस्येवर विशेष चर्चा करण्यासाठी बुधवार 30 एप्रिल 2025 रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय येथे सकाळी 9.30 वा. नांदेड येथील न्यायालयाचे _प्रमुख_ न्यायाधीश दलजीतजी



कौर जज यांनी आढावा बैठक बोलावली आहे. जिल्ह्यातील ऊसतोड कामगार, मुकादम, ऊस वाहतूकदार, अपघाती मयत ऊसतोड कामगारांचे जे वारस असतील त्यांना याची नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

या बैठकीला तुळजाभवानी ऊसतोड कामगार संघटनेस सामाजिक न्याय विभाग नांदेड यांच्यावतीने निमंत्रित करण्यात आले आहे. या बैठकीचे आयोजन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नमस्कार चौकाजवळ ग्यानमाता शाळेसमोर नांदेड येथे करण्यात आले आहे. संबंधित सर्वांनी या बैठकीस 30 एप्रिल रोजी सकाळी 9.30 वा. जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## देशभरात नवी १०० नर्सिंग महाविद्यालये सुरू करणार: जे. पी. नड्डा

**छत्रपती संभाजीनगर :** सरकारने कॅन्सरच्या उपचाराला प्राधान्यक्रम दिले आहे. वैद्यकीय शिक्षण असो की आरोग्य सेवा, निधीची कमतरता राहणार नाही. देशात १०० वैद्यकीय महाविद्यालयांसोबत नवे



१०० नर्सिंग कॉलेज सुरू केले जातील. यात गोंदियात १९५ कोटी रुपयांच्या निधीतून आणि नंदूरबारमध्ये ३२५ कोटींतून हे कॉलेज स्थापित केले जातील. महाराष्ट्रास १० नवी वैद्यकीय महाविद्यालये देण्यात आली असून, त्यात आणखी एकाची भर पडत आहे. एमबीबीएसच्या ७०० जागा वाढल्या आहेत. नागपूर, मुंबईसह सहा ठिकाणी नवीन कॉलेजही दिले, असे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री जे. पी. नड्डा म्हणाले.

## बालकांच्या अनधिकृत संस्थाविरोधात कठोर कार्यवाही

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड दि. 28 एप्रिल :-** जिल्ह्यात बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृह, अनाथाश्रम, अनधिकृत संस्था आढळुन आल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड तसेच नांदेड चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक 1098 वर संपर्क साधावा. बालकांवरील शारिरिक तसेच लैगिंक अपराध प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती रुपाली रंगारी-कोल्हे यांनी केले आहे.

पुणे जिल्हातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृह, अनाथाश्रम, चालविले जात असल्याबाबत माध्यमाद्वारे वृत्त प्रकाशित झाले होत. या संस्थेत बालकांना अनाधिकृत डांबुन ठेवून त्यांचे शारिरिक, मानसिक, लैगिंक शोषणाच्या घटना घडत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याबाबत निर्देशनास येत आहे. ही बाब गंभीर असून बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) 2021 मधील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 मधील कलम 42 नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला 1 वर्षे कारावास व 1 लाखापेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल, अशी तरतुद अधिनियमात करण्यात आलेली आहे.

# आता उत्सुकता जिल्हा परिषदच्या आरक्षणाची !

## ग्राम पंचायतच्या आरक्षणानंतर भावी सरपंच वाढले

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड / ज्ञानेश्वर डोईजड**

आगामी 2025-30 च्या निवडणूकीच्या अनुषंगाने मुखेड तालुक्यातील 129 ग्राम पंचायतीचे आरक्षण सोडत नुकतीच पार पडली. या आरक्षण सोडतीनंतर प्रत्येक ग्राम पंचायतमध्ये भावी सरपंच वाढले असुन आता मिनी मंत्रायल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदच्या आरक्षणाकडे सर्वांच्याच नजरा लागल्या आहेत.

तालुक्यात 7 तर मतदारसंघात 9 जिल्हा परिषदा येतात. मागील तीन वर्षापासुन जिल्हा परिषदवर प्रशासक राज असुन जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत. मागील अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदची तयारी अनेक भावी जिल्हा परिषद सदस्य करीत आहेत. पण निवडणुका लांबणीवर जात असल्याने अनेकांची निवडणूक लढवू नये अशी भावना निर्माण झाली आहे.

मागील विधानसभा निवडणूकीत मुखेड - कंधार मतदारसंघात ज्याप्रकारे आर्थिक उलाढाल झाली ते पाहता अनेक भावी हे भावीच राहणे पसदं करीत असल्याचे चित्र आहे. नको बापु... आता निवडणूक लढवून फायदा नाही... लई पैसा लागालाय...अशी चर्चा ग्रामीण भागात जोरात चर्चा सुरु आहे. तरीही अनेक मातब्बर नेते व पुढारी जिल्हा परिषद च्या आरक्षणाची वाट आहेत.




**मुखेड - कंधार मतदारसंघात भाजपाचे वर्चस्व असुन विरोधक जेमतेम नाही म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सरकारच्या भूमिकेवर व जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी विरोधातील बहुतांश राजकीय पुढारी गप्प असुन कॉंग्रेसचे नांदेड जिल्हाध्यक्ष पद मुखेडमध्ये असूनही कॉंग्रेसचा प्रभाव मात्र दिसत नसल्याचे चित्र आहे.एकंदरीत पाहता ग्राम पंचायतचे आरक्षण झाले आता जिल्हा परिषद,पंचायत समिती,महानगरपालिका व नगरपालिकेचे आरक्षणाकडे सर्वांच्याच नजरा लागल्या आहेत.**

## संपादकीय

# मत्स्य व्यवसायाच्या अर्थव्यवस्थेला बळ

मत्स्य व्यवसायाला महाराष्ट्र राज्य सरकारने कृषीचा समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेतला आणि कोकणची 720 कि.मी. लांबीची किनारपट्टी आनंदीत झाली. केवळ आणि केवळ मासेमारी हाच व्यवसाय असलेल्या किनारपट्टीवरील 103 गावांची आर्थिक भरभराट होणार असल्यामुळे या गावांमध्ये उत्सव आणि जल्लोष सुरू आहे. राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी गेल्या दीड महिन्यात सर्व ताकद वापरून राज्य सरकारकडून हा निर्णय करून घेतला. गेल्या 22 तारखेला राज्य मंत्रिमंडळाने या निर्णयाला हिरवा कंदील दाखवला आहे.

राज्य सरकारकडून कृषी क्षेत्रासाठी ज्या योजना राबविल्या जातात तशाच योजना आता मत्स्य व्यवसायासाठी अमलात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शेतकरी सन्मान योजनेची वर्षाकाठींचे 6 हजार रुपये आता कोकणातील मच्छीमार बांधवांनाही लागू झाले आहेत. पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांना खेटून ही कोकण किनारपट्टी आहे. या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नात मत्स्य व्यवसायाचा वाटा तसा लक्षवेधी आहे, पण या निर्णयानंतर आता मोठ्या प्रमाणात मत्स्य उत्पादनात वाढ होईल हे निश्चित आहे. खरेतर देशातल्या आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, कर्नाटक, बिहार या राज्यांनी मत्स्य व्यवसायासाठी यापूर्वीच कृषी क्षेत्राप्रमाणेच अनेक योजना राबविल्या.

परिणामस्वरूप गेल्या सहा वर्षांमध्ये देशात सर्वात मत्स्य उत्पादन घेणाऱ्या आंध्र प्रदेशच्या उत्पन्नात 50 टक्क्याने वाढ झाली आहे. कर्नाटक राज्याने तर ही वाढ 103 टक्केपर्यंत नेली आहे. छत्तीसगड 72 टक्के आणि झारखंड राज्याने 50 टक्केपर्यंत मत्स्योत्पादनात वाढ केली आहे. तद्वतच महाराष्ट्रात तर मत्स्योत्पादन वाढीला खूप मोठा वाव आहे. समुद्र किनारपट्टीसोबतच भूजलाशयीन मासेमारी महाराष्ट्रात सुमारे 4 लाख हेक्टर क्षेत्रावर होते. यामध्ये अर्थातच तलावे, नदी आणि मोठ्या धरणांचा समावेश आहे. महाराष्ट्रामध्ये समुद्रातील मासेमारीचे वार्षिक उत्पादन जवळपास 4 लाख 50 टन इतके आहे तर गोड्या पाण्यातील मासेमारी दीड लाख टन इतकी होते. या नव्या निर्णयामुळे पुढच्या तीन-चार वर्षांत हे मत्स्योत्पादन 10 लाख टनाच्या वर जाऊ शकते. कोकण किनारपट्टीवर 5 हजारपेक्षा अधिक ट्रॉलिंग आणि गिलनेटच्या बोटी समुद्रात मासेमारी करतात. मत्स्य व्यवसायाकडे आजवर तितकेसे राज्य सरकारने गांभिर्याने लक्ष दिले नव्हते. त्यामुळे कोकण समुद्रातील हा मच्छीमार तसा संघर्षच करत होता. त्याचा गैरफायदा परप्रांतीय ट्रॉलर्स सतत घेत होते. त्यांचे आक्रमण अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण करत होती. अनेक राज्यांमधील सरकारचा आश्रय असलेल्या या परप्रांतीय मच्छीमारांशी दोन हात करताना कोकणातील मच्छीमारांना लढाया लढाव्या लागत होत्या. आता मात्र या नव्या धोरणामुळे मच्छीमाराच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळाले आहे. याचा फायदा परदेशातील निर्यातीच्या वाढीमध्ये होईल. मत्स्योत्पादन वाढेल आणि मच्छीमारांच्या घरी आर्थिक समृद्धी येईल.

कृषीचा दर्जा दिल्यामुळे मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्यकांस्यकार यांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक योजनांचा लाभ मिळणार आहे. विजेच्या दरात सवलत मिळेल. त्यामुळे मत्स्य बीज केंद्रे, प्रक्रिया युनिट, मत्स्य विक्री केंद्रे, मत्स्य शेती यासाठी विजेची सवलत मिळणार आहे.

यापुढे शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्य व्यवसायासाठी मच्छीमारांनाही विमा सवलत मिळणार आहे. तोक्ते, निसर्ग सारखी चक्रीवादळे सर्वात जास्त मच्छीमारांचे नुकसान करून जातात. यापुढे या मत्स्य व्यावसायिकांना कृषी क्षेत्राप्रमाणे नुकसानभरपाई मिळणार आहे.

# टंचाईग्रस्त देगलूर, मुखेड तालुक्याची तहान भागणार

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** लेंडी आंतरराज्य प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगणा राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पाची पाणी वापर क्षमता 5.23 टीएमसी इतका असून प्रकल्पामुळे 26 हजार 924 हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

काल 26 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या उपस्थितीत लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीबाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये नागरी सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच कामाच्या नियोजनाबाबत माहिती घेण्यात आली. प्रकल्पग्रस्तांसाठी वाढीव कुटूंब पुर्नवसन अनुदान वाटप करणे, शेतकऱ्यासाठी सानुग्रह अनुदान वाटप करणे व पहिल्या टप्प्यातील 7 गावातील भुखंड वाटप करणे इत्यादी गोष्टीचा परामर्श घेण्यात आला.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी पुर्नवसन मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता देगलूर दाभाडे, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प देगलूरचे विवेकानंद तिडके, कार्यकारी अभियंता महावितरण पेंडारकर, तहसिलदार मुखेड जाधव, पोलीस निरीक्षक श्री. तिडके, श्री. टाक शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, सरपंच भिंगोली गाढवे, उपसरपंच सोनकांबळे आदीची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले बैठकीचा समारोप करताना देगलूर व मुखेड तालुक्यातील पाणी टाचाईची परिस्थीती विशद केली. येणाऱ्या काळात देगलूर व मुखेड तालुक्याला पाण्याची भीषण पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता असल्यामुळे आता आगामी काळात याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. देगलूर, मुखेड तालुक्याची तहान भागविण्यासाठी आंतरराज्यीय लेंडी प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. लेंडी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व आवश्यक गोष्टी पूर्ण झालेल्या आहेत. घळभरणी केल्यास धरणात 145.15 दलघमी 5.23 टीएमसी उपयुक्त पाणी साठा निर्माण होईल. यामुळे देगलूर व मुखेड तालुक्याची तहान भागेल. तसेच समांतरपणे मुखेड तालुक्यातील बुडीत होणाऱ्या सर्व गावांचा प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले आहेत.

शेतकऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान वाटप, वाढीव कुटूंब पुर्नवर्सन अनुदान वाटप, भुखंड वाटप तसेच सर्व गावातील नागरी सुविधा लवकरात लवकर पुर्ण करुन प्रकल्पग्रस्तांना स्थानांतरीत करण्याचे व प्रकल्पाचे घळभरणीचे आदेश जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिले आहेत.

# चिनी वर्चस्वाला अमेरिकन प्रतिकार

चीनने जहाज आणि कंटेनर उत्पादनात जागतिक वर्चस्व प्रस्थापित करून, पुरवठा साखळीवर मक्तेदारी मिळवली आहे. आक्रमक उत्पादक धोरण आणि विश्वासघातकी स्वार्थी व्यापार यांच्याबळावर तो जगाला नेहमीच वेठीस धरत आला आहे. अमेरिकेने चिनी जहाज आणि कंटेनरवर वाढवलेले आयातशुल्क, हे त्याविरोधातील एक ठोस पाऊल आहे. या क्षेत्रातील चिनी क्षमता आणि एकाधिकारशाहीमुळे अमेरिका, भारत आणि अन्य देशांनी या क्षेत्रातील प्रगती वाढवणे आज काळाची गरज आहे...

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने दि. 14 ऑक्टोबर रोजीपासून चीनमध्ये तयार झालेल्या आणि चीनच्या जहाजांसाठी, अमेरिकेच्या बंदरात प्रवेश शुल्कात मोठी वाढ करण्याची घोषणा केली. त्यानुसार या जहाजांना प्रति टन 50 डॉलर्स म्हणजेच अंदाजे 4 हजार, 200 रुपये शुल्क आकारले जाणार आहे. तसेच पुढील तीन वर्षांसाठी हे शुल्क दरवर्षी 30 डॉलर्स म्हणजे सुमारे 2 हजार, 500 रुपयांनी वाढेल. हे पाऊल का उचलले जात आहे? चीनची जहाज वाहतूक, जागतिक स्तरावर अचानक छाननीच्या घेऱ्यात का आली आहे?

जागतिक शिपिंगमध्ये चीनचा उदय

आज चीन जागतिक व्यापारी जहाज क्षेत्रात, मालवाहतूक क्षमतेच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त वाटा उचलतो आणि कंटेनर उत्पादनात चीनची जागतिक स्तरावर मजबूत पकड आहे. चीनला हे वर्चस्व अचानक मिळालेले नाही, तर ते दीर्घकालीन नियोजन, आक्रमक सरकारी मदत आणि जहाजबांधणी, बंदर विकास आणि सागरी लॉजिस्टिक्समधील धोरणात्मक गुंतवणुकीचे आणि प्रभावी अंमलबजावणीचे फळ आहे.

अमेरिकेचे मुख्य उद्दिष्ट चीनच्या याच अनुचित व्यापार पद्धती आणि धोरणांना लक्ष करून, चीनच्या जहाज बांधणीतील वाढत्या वर्चस्वाला आव्हान देणे हे आहे. चीनच्या अमर्याद वर्चस्वाची ही चिंता अनेक वर्षांपासून वाढत आहे. 2024 साली 'युएस ट्रेड रिप्रेझेन्टेटिव्ह' अर्थात 'युएसटीआर' या संस्थेने याची चौकशी केली होती. या चौकशीत चीन जगाच्या कितीतरी पुढे आहे हे स्पष्ट झाले. कारण, चीन गरज पडल्यास जागतिक व्यापार थांबवू शकतो किंवा अचानक किमती वाढवू शकतो हे समोर आले. चीनने रेड मिनरलच्या पुरवठा साखळीत अचानक बदल करून, जगाला याची प्रचिती दिली आणि आपण किती धोकादायक पुरवठादार देश आहोत हेसुद्धा दाखवून दिले.

चिनी जहाजांवर अमेरिकेची शुल्क कारवाई

आता अमेरिका चिनी जहाजांवर आयातकर लावणार आहे, जो त्यांना अमेरिकेच्या बंदरात व्यापारी जहाजे आणल्यास भरावा लागेल. 'युएसटीआर'नुसार, नवीन बंदर शुल्क त्याच्या घोषणेपासून 180 दिवसांच्या आत लागू केले जाईल आणि त्याची रचना खालीलप्रमाणे असेल.

चीननिर्मित आणि मालकीची जहाजे: सुरुवातीला प्रति टन 50 डॉलर्स, तीन वर्षांत दरवर्षी प्रति टन 30 डॉलर्सने वाढ.

पर्यायी शुल्क रचना: प्रति डिस्चार्ज कंटेनर 120 डॉलर्स, तीन वर्षांनंतर प्रति डिस्चार्ज कंटेनरमध्ये 250 डॉलर्सपर्यंत वाढ.

चीननिर्मित जहाजे चालवणाऱ्या इतरदेशीय कंपन्या: प्रति निव्वळ टन 18 डॉलस, वार्षिक पाचने वाढ.

वाहने वाहून नेणारी बिगर युएसनिर्मित जहाजे : प्रति वाहन 150 डॉलर्स.

सूट : धान्य किंवा कोळसा यांसारख्या मोठ्या प्रमाणात वस्तू वाहून नेणारी रिकामी जहाजे,



आयातकरातून वगळण्यात आली आहेत.

शुल्क मर्यादा : प्रत्येक जहाजासाठी वर्षातून, जास्तीत जास्त सहावेळा शुल्क लागू होईल.

यापूर्वी चीनच्या जहाजांवर प्रति पोर्ट कॉल एक दशलक्ष किंवा चीननिर्मित जहाजांचे प्रमाण जास्त असलेल्या ताफ्यांसाठी, 1.5 दशलक्ष शुल्क आकारण्याचे प्रस्ताव वगळण्यात आले आहेत.

चीनने वर्चस्व कसे मिळवले

जागतिक शिपिंगमध्ये एकेकाळी मागे असलेल्या चीनने, आता या उद्योगात मोठे स्थान मिळवले आहे. त्यामागील काही महत्त्वाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत,

1999 साली जागतिक जहाजबांधणी बाजारपेठेत, चीनचा वाटा पाच टक्क्यांपेक्षा कमी होता. 2023 सालापर्यंत, 50 टक्क्यांपेक्षा जास्त जहाजे चिननिर्मित आहेत.

2024 मध्ये, सर्व नवीन जहाज बांधणीच्या मागणीपैकी, 74 टक्के जहाजांची निर्मिती करण्याचे कंत्राट चीनच्या शिपयार्ड्सला मिळाले होते.

चीन दरवर्षी 1 हजार, 700 हून अधिक जहाजे तयार करतो, तर अमेरिकेचे उत्पादन केवळ पाच जहाजे प्रतिवर्षी आहे.जागतिक कंटेनर उत्पादनाच्या 95 टक्के आणि इंटरमॉडेल चेसिसच्या 86 टक्के उत्पादन चीनमधील कंपन्या करतात. 2024 साली चीनच्या व्यावसायिक व्यापारी जहाजांचा ताफा, 430 दशलक्ष डेडवेट टनपर्यंत वाढला, जो जागतिक क्षमतेच्या सुमारे 18.7 टक्के आहे. 'सीएनबीसी'च्या अहवालानुसार, लवकरच जगातील व्यापारी जहाजांच्या ताफ्यातील 98 टक्के जहाजे, चिनी बनावटीची असण्याची शक्यता आहे.

चीनच्या प्रगतीमगाचा धोका

चीनचे शिपिंगमधील वर्चस्व, जगातील सर्वांत मोठा निर्यातदार देश म्हणून अधिक महत्त्वाचे ठरते. 2023 साली चीनने 3.42 ट्रिलियन डॉलर्स किमतीच्या वस्तू निर्यात केल्या, ज्याची प्रमुख बाजारपेठ अमेरिका (436 अब्ज डॉलर्स), हाँगकाँग, जपान, जर्मनी आणि दक्षिण कोरिया ही होती. चीनची निर्यातीवर आधारित अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात, सागरी वाहतुकीवर अवलंबून आहे. जागतिक व्यापाराच्या 85 टक्क्यांपेक्षा जास्त व्यापार समुद्रमार्गे होतो. इलेक्ट्रॉनिक्सपासून ते कच्च्या मालापर्यंत, चीन जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा भाग आहे. चीन या पुरवठा साखळीचा शस्त्र म्हणून वापर करू शकतो आणि पुरवठा अचानक थांबवून, कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा धोका निर्माण करू शकतो. अमेरिका या अवलंबत्वाला एक धोरणात्मक असुरक्षितता मानते, जी संघर्ष किंवा संकटाच्या वेळी आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण करू शकते. हाच धोका भारत आणि जगासाठीही आहे.

अमेरिकेचा दृष्टिकोन आणि धोरणात्मक उद्दिष्टे

अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी स्पष्ट केले की, जहाजे आणि शिपिंग हे अमेरिकेच्या, जगाच्या आणि भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि व्यापाराच्या मुक्त प्रवाहासाठी महत्त्वाचे आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या या कृतीचा उद्देश चीनचे वर्चस्व कमी करणे, पुरवठा साखळी सुरक्षित करणे आणि अमेरिकेत तयार होणाऱ्या जहाजांच्या बांधणीला, प्रोत्साहन देणे आहे. अमेरिका प्रशासनाच्या व्यापक धोरणात चीनमध्ये तयार झालेल्या पोर्ट क्रेनवर, 100 टक्के कर आकारण्याचाही समावेश आहे, जो सध्या चीनचे वर्चस्व असलेल्या पायाभूत सुविधांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

जागतिक चिंता आणि पुरवठा साखळीतील अडथळे

अमेरिकेच्या प्रस्तावित बंदर शुल्कामुळे, चीनला मोठा फटका बसू शकतो. यामुळे जहाजांचे मार्ग बदलण्याचीही शक्यता आहे. कारण, अमेरिकेला जाणारी जहाजे आता बिटन आणि युरोपातील बंदरांकडे वळवली जाऊ शकतात. कारण, जास्त आयातशुल्क भरणे कोणालाच आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसेल. 'लॉजिस्टिक्स फर्म फ्लेक्सपोर्टचे सॅन मॅण्डर्स' यांनी इशारा दिला आहे की, मार्गात बदललेल्या जहाजांमुळे युरोपातील बंदरे लवकरच जास्त मालाने भरून जातील. युरोपियन अर्थव्यवस्थेवर याचाही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. या बदलांमुळे चीनचा शिपिंग खर्च वाढू शकतो आणि जगभरातील चिनी मालाच्या वितरणात विलंब होऊ शकतो. ज्यामुळे औद्योगिक उत्पादनांपासून ते ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंत, सर्वच गोष्टींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही भारतासाठी एक संधी ठरू शकते.

चीनचा प्रतिसाद

चीनने अमेरिकेच्या या उपायांना संरक्षणवादी आणि जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अस्थिर करणारे धोरण म्हणून निषेध केला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान म्हणाले, अमेरिकेच्या या कृती जागतिक उत्पादन आणि पुरवठा साखळीत अडथळा निर्माण करतात. या उपायांमुळे, अमेरिकेतील जहाजबांधणी उद्योगाला पुनर्जिवित करण्यात यश मिळणार नाही.

अमेरिकेतील देशांतर्गत प्रतिक्रिया

या निर्णयावर, अमेरिकेत संमिश्र प्रतिक्रिया दिसून येत आहेत. 'युनायटेड स्टीलवर्कर्स आणि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ मशिनिस्ट्स' यांसारख्या कामगार संघटनांनी, या निर्णयाचे समर्थन केले आहे. कारण, ते या धोरणाला अमेरिकेतील जहाजबांधणी उद्योगाला पुन्हा चालना देणारे, रोजगार निर्माण करणारे धोरण म्हणून पाहतात. तर, 'अमेरिकन पेरल ऑण्ड फूटवेअर असोसिएशन'सारख्या व्यापारी गटांनी असा युक्तिवाद केला आहे की, या शुल्कामुळे व्यापाराचे प्रमाण कमी होईल आणि अमेरिकन ग्राहकांसाठी खर्च वाढेल. दि. 19 मे रोजी होणाऱ्या सुनावणीत, जहाज-टू-शोअर क्रेन, चेसिस आणि संबंधित उपकरणांवरील प्रस्तावित शुल्कांवर विचार केला जाणार आहे.

भारताची भूमिका आणि आव्हान

भारतालाही चीनच्या वाढत्या प्रभावामुळे, आर्थिक सुरक्षिततेबद्दल चिंता वाटू लागली आहे. भारताने आपल्या बंदरांच्या विकासावर आणि जहाज बांधणी उद्योगावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

पुढील मार्ग

अमेरिका आपल्या सागरी उद्योगाला पुन्हा एकदा मजबूत करण्यासाठी, शुल्क आणि आयातशुल्काचा वापर करण्याचा विचार करत आहे. मात्र, जहाज बांधणीमध्ये आणि जागतिक व्यापार पुरवठा साखळीत चीनला वगळून स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी, अमेरिकेला आणि भारताला खूप प्रयत्न करावे लागतील. जागतिक शिपिंगमध्ये चीनचे वर्चस्व हे एक गंभीर आव्हान आहे. अमेरिकेला आणि भारताला आपल्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी आणि व्यापाराच्या मुक्त प्रवाहासाठी चीनच्या वर्चस्वाला सामोरे जावे लागेल. यासाठी अमेरिकेला आणि भारताला इतर देशांसोबत भागीदारी करणे आवश्यक आहे. तसेच, त्यांना आपल्या जहाज बांधणी उद्योगात गुंतवणूक करणेही आवश्यक आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ हदगाव, तामसा , निवघा कडकडीत बंद

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** जम्मू काश्मीर मधील पर्यटन स्थळ पहेलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांची २२ एप्रिल रोजी जात पुसून गोळ्या झाडून २६जणांची हत्या करण्यात आली या घटनेमुळे भारतामध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे आज २८ रोजी सर्वपक्षीय सर्व धर्मीय सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने हदगाव तामसा निवघा शहर कडकडीत बंद पाळत निषेध केला या निषेधला व्यापाऱ्यानी आपले दुकाने बंद ठेवून उस्फूर्त प्रतिसाद दिला. जम्मू काश्मीर मध्ये पहेलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांची अमानुष बेधुंद २६ पर्यटकांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. याचे पडसाद पूर्ण भारतभर उमटत असून ठीक ठिकाणी बंद पाडून आंदोलन करून निषेध व्यक्त करीत आहेत आज तामसा हदगाव शहर निवघा कडकडीत बंद पाडून व्यापाऱ्यांनी निषेध नोंदवला याबाबत भारतीय जनता पार्टीचे हदगाव पूर्व तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांना निवेदन देत तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत हदगाव तालुका बंद करत असल्याबाबतचे निवेदन सादर केले सकल हिंदू धर्मियांनी आंबेडकर चौक येथे पाकिस्तानी झेंडा जाळून निषेध व्यक्त केला तसेच तामसा येथे जुने बसस्थानक परिसरात पाकिस्तानी झेंडा जाळून निषेध व्यक्त केला तर व्यापाऱ्यांनी आपले प्रतिष्ठाने बंद ठेवून निषेध नोंदवला तालुक्यात हा बंद शांततेत पार पडला हदगाव पोलीस स्टेशन तामसा पोलीस स्टेशन निवघा पोलीस स्टेशन प्रत्येक ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता उन्हाची तीव्रता वाढली असल्यामुळे नागरिकांनी सुद्धा बाहेर जाणे पसंद केले नाही त्यामुळे सर्वत्र रस्ते सुनसाट दिसून आले होते. पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्याला भारताने प्रत्युत्तर द्यावे अशी मागणी आंदोलन कर्त्यातून दिसून आली.



# गोदावरी काठावर तथागतांचे स्तूप उभारण्यासाठी कटिबद्ध : आ. संजय बनसोडे

## डॉ.बी.आर. आंबेडकर फाउंडेशन चा कृष्णाई पुरस्कार वितरण सोहळा थाटात

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड :** नांदेड शहरातील गोदावरी नदीकाठावर विश्वशांती दूत , तथागत गौतम बुद्ध यांचे स्तूप उभारण्यासाठी आणि 105 फूट उंचीची बुद्ध मूर्ती स्थापन करण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करू असा विश्वास राज्याचे माजी मंत्री तथा उदगीरचे विद्यमान आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. डॉ.बी आर आंबेडकर फाउंडेशन च्या वतीने काल कृष्णाई पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महातेरो , भंते पयाबोधी थेरो यांच्यासह आ. भीमराव केराम , आ. प्रतापराव पाटील चिखलीकर , माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, ना. जयदीप भाई कवाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी , बी आर आंबेडकर फाउंडेशन चे अध्यक्ष बापूसाहेब गजभारे , सचिव आकाश गजभारे , स्वागताध्यक्ष पंढरीनाथ बोकारे सतीश बनसोडे विनोद भरणे साहेबराव सोनकांबळे आदींची उपस्थित होती.

पत्रकारितेसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी कृष्णाई पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला यात. स्मृतीशेष मनोज




नागोराव गजभारे यांच्या स्मृतीपित्यार्थ देण्यात येणारा प्रज्ञावंत विद्यार्थी पुरस्कार कुमारी शीतल संतोष गोमस्कर यांना प्रदान करण्यात आला. फोटोग्राफी आणि ग्रामीण पत्राकारितेसाठीसाठी हाफिस घडीवाला , पत्रकारिता , शिक्षण , कामगार चळवळीसाठी प्रदीप नागपूरकर , पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रासाठी राम तरटे यांना यावेळी कृष्णाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**प्रारंभी महामानवांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन करण्यात आले. त्यानंतर पूज्य भंते पय्यंबोधी थेरो आणि पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी उपस्थितान आशीर्वाद दिला. प्रास्ताविक बापूसाहेब गजभारे यांनी केले तर आभार आकाश गजभारे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार राम तरटे यांनी केले.**

सामाजिक, राजकीय आणि धम्म कार्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी मंत्री तथा उदगीरचे विद्यमान आमदार संजयजी बनसोडे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . रोख रक्कम , मानपत्र शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर याचवेळी नांदेड शहरात गोदावरी नदीच्या काठावर तथागत बुद्धांची मूर्ती स्थापन करण्यासाठी शासनाकडे 75 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करणारे महानगरपालिकेचे आयुक्त महेश कुमार डोईफोडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. डोईफोडे यांच्यावतीने महापालिकेची अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी हा सन्मानित स्वीकारला.

## कोळनूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड तालुक्यातील कोळनूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यांयात आली.
या जयंतीनिमित्त प्रमुख वक्ते म्हणून सिद्धार्थ कांबळे बेळीकर यांनी भूमिका मांडली. यात तरुणांनी व्यसनापासून दूर राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण करावा असा संदेश दिला. यावेळी प्रमुख उपस्थिती अनिल सिरसे (रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष नांदेड ), डॉ. राहुल कांबळे तसेच गावातील रमाकांत पाटील (सोसायटी चेअरमन ) व सूर्यकांत सोनकांबळे (माजी सरपंच ), गावातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य तसेच बौध्द उपासक उपासिका गावातील नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.



## भाग्यश्री रानवळकर -रोडे यांना पीएच.डी पदवी प्रदान

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,कडून त्यांना मराठी विषयात विद्यावाचस्पती( Ph.d) प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय 'लीला शिंदे यांच्या समग्र बाल वाङ:मया चा चिकित्सक अभ्यास' हा होता .या कामी त्यांना मार्गदर्शक म्हणून यशवंत महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप सर यांचे मार्गदर्शन लाभले . या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. दलित मित्र ॲड. नामदेवराव रानवळकर यांच्या त्या कन्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल डॉ. संतोष रोडे,बी .आर. मोरे, गंगाधर रानवळकर, विजयकुमार रानवळकर,डॉ.विजय भास्कर , एडवोकेट सुनील कांडलीकर, माधव भिसे, दर्शन रानवळकर, एडवोकेट प्रसाद रानवळकर, बालाजी रानवळकर, अजिंक्य रानवळकर, डॉ.भगवान सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.

# आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी वर्गाच्या कामाची प्रशासनाकडून दखल

## आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारीवर्गाचा सन्मान

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** केंद्र राज्य शासनाकडून आरोग्य विभाग अंतर्गत राबवीत असलेल्या विविध योजनेतील आर सी एच कार्यक्रम, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, प्रस्तुती संदर्भ सेवा, एम सी डी कार्यक्रम,
पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया, पिंपळगाव येथील शिव महापुराण कथेतील भव्य आरोग्य शिबिर यशस्वी नियोजनासह विविध उपक्रमात उल्लेखनीय कार्याबद्दल तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर संजय मुरमुरे यांच्या सह तालुका जिल्ह्यतील वैद्यकीय अधिकारी रत्नदीप सोलेवाड वैद्यकीय अधिकारी, डॉ ऐश्वर्या सिरसाट पब्लिक हेअल्थ स्पेसिलिस्ट, एस, एस सानप आरोग्य सेवक माळेगाव,श्रीमती मीना राठोड ,जी एन ए संदर्भ



तामसा, बालाजी कूटूरवार आरोग्य सहाय्यक निमगाव यांचा सन्मान करण्यात आला.
यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ हिराणी , जिल्हा आरोग्य अधिकारी

मला मिळालेला सन्मान हा सबंध हदगांव तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी वर्गाच्या कामाची दखल असून या पुढील काळात शासन प्रशासनाकडून दर्जात्मक आरोग्य सेवा जनतेस देण्याचा आरोग्य विभागाचा प्रयत्न राहील.
**डॉ संजय मुरमुरे**
**तालुका आरोग्य अधिकारी हदगांव**

डॉ संतोष सुर्यवंशी,डॉ शेख बालन, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश कोपुरवाड, प्रभारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ शिवशक्ती पवार यांच्या उपस्थितीत प्रशस्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## कु.दुर्गा बेळे चे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड तालुक्यातील चोंडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व तुपदाळ बू येथील ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर नरसिंगराव बेळे तूपदाळ यांची पुतणी कु. दुर्गा माधव बेळे



हीने गावात पाचवी चा वर्ग नसल्याने रोज ३ किलोमीटर पायी प्रवास करून चोंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून इयत्ता पाचवी वर्गातून महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पूणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले.

शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १८२ गुण मिळवून पात्र ठरत यश संपादन केले आहे. शिक्षक हिवराळे सर,रूदरावाड सर व पूर्ण स्टाफ यांच्या व तुपदाळ बू येथील शिक्षक गोरशेटवार सर, गिरीसर यांच्या मार्गदर्शनाखाली दूर्गा माधव बेळे हिने हे यश संपादन केले आहे .मिळवलेल्या यशाबद्दल मुख्याध्यापक शालेय समिती अध्यक्ष, सरपंच , सदस्य, पोलिस पाटील गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक दगडे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**बिलोली -** बिलोली येथील विद्यानिकेतन प्राथमिक शाळेत मागील २८ वर्षापासून ज्ञानदानाबरोबरच उत्तम प्रशासकाची भूमिका बजावणारे तसेच समाज घटकातील गोरगरिबांना सहकार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणून मुख्याध्यापक अशोक दगडे यांची एक वेगळी ओळख परिसरात आहे. नियतवयोमानानुसार ३१ मार्च रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती कार्य गौरव सोहळा दि.२६ एप्रील शनिवारी विद्यानिकेतन विद्यालयाच्या प्रांगणात स्नेही मित्र शिक्षक वृंध विद्यार्थी आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सुनील यंबडवार तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार सुभाष साबणे, जिल्हा शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक हवगीरराव गोपछडे, माजी नगराध्यक्ष यादवराव



तुडमे, भिमराव जेठे,हाजप्पा पाटील, संस्थेच्या अध्यक्ष शकुंतला यंबडवार, प्राचार्या स्वाती गोपेवाड, नागनाथराव दगडे, विजयकुमार होपळे, मुकींदर कुडके यांची उपस्थिती होती.

यावेळी अशोक दगडे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. समाजसेवेची नाळ जुळवून ठेवलेल्या दगडे यांनी सेवानिवृत्तीच्या दिवशीही वसतिगृहातील सर्व मुलांना दगडे परिवाराच्या वतीने गणवेश देऊ केले. विद्यालयाच्या वतीने त्यांचा कपडेरूपी आहेर भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या परिवारातील सर्व सदस्यांची व नातलगांची उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक वैजनाथ पाटील यांनी केले. बालाजी वारघडे यांनी सूत्रसंचालन केले तर संतोष धुप्पे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दिवंगत शांताबाई कवठेकर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त गरजूंना अन्नदान वाटप संपन्न

**लातूर :** येथील विश्वनाथराव कवठेकर सेवाभावी संस्थेचे संचालक तथा युथ पॅंथर संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सिद्धार्थ भैया कवठेकर यांच्या मातोश्री दिवंगत शांताबाई भिमराव कवठेकर यांच्या प्रथम पुण्य स्मृती दिनानिमित्त अन्नदान वाटप करण्यात आले .
दिवंगत शांताबाई भिमराव कवठेकर ह्या धडाडीच्या, मनमिळावू, स्पष्टवक्त्या आणि सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार अग्रेसर राहायचा. बौद्ध समाजातील महिला मंडळात ते आवर्जून कोणत्याही कार्यक्रमात भाग घेत होत्या. स्पष्ट वक्त्या असल्याने महिला मंडळ ही त्यांनाच पुढाकार देत होत्या.

# पहलगाम हल्ल्याचा हिमायतनगर येथील सकल हिंदू समाजातर्फे जाहीर निषेध

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हिमायतनगर -** जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी 28 हिंदूंची धर्म विचारून गोळ्या झाडून क्रूर हत्या केली त्या घटनेचा हिमायतनगर शहरातील सकल हिंदू समाज बांधवांनी जाहीर निषेध करण्यासाठी शहरातील श्री परमेश्वर मंदिर समोर सर्वपक्षीय सकल हिंदू समाज बांधवांकडून जाहीर निषेध सभा घेऊन पहेलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली
यावेळी बोलताना विश्व हिंदू परिषदेचे शामजी रायेवार यांनी असे सांगितले की जम्मू काश्मिर येथील पहलगाव येथे आतंकवाद्यांनी पर्यटकावर केलेल्या अंदाजानंद गोळीबारात 28 निष्पा पर्यटकांचा मृत्यू झाला या घटनेचा तीव्र पडसाद म्हणून संपूर्ण देशासह जगभरात उमटत आहेत



या भ्याड हल्ल्याचा सर्व समाजाकडून आज दि 22 एप्रिल रोजी निषेध करून जो आपल्या हिंदू धर्माची जात विचारून तेथील अतिरेक्यांनी हल्ला केला त्याचा मी जाहीर निषेध करतो तसेच आपण जातीपातीचे राजकारण बाजूला ठेवून सर्व हिंदू बांधवांनी एकत्र होऊन हिंदू धर्म जागृत ठेवला पाहिजे तसेच हा भ्याड हल्ला करणाऱ्या सर्व अतिरेक्यांना कठोरात कठोर शासन मिळायला पाहिजे आणि या अतिरेक्यांना आश्रय देणारे भारतातील त्यांचे हस्तक व पाकिस्तानी हल्लेखोरांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय असे हल्ले थांबणार नाहीत त्यासाठी सरकारसोबत सकल हिंदू धर्माने एकत्र येऊन संघर्ष करावा लागेल
यावेळी श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ ,श्यामजी रायेवार, उत्तरवार सर, भाजपा तालुका अध्यक्ष गजानन चायल, माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड, विपुल दंडेवाड, राम सूर्यवंशी प्रवीण जनावार,यांच्यासह विविध संघटना विश्व हिंदू परिषद बजरंग दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपा सह इतर सकल हिंदू धर्माचे असंख्य बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# रयत प्रतिष्ठानचे मदतीचे जाळे किनवट पर्यत पोहचले

## सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी हात पुढेच

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** प्रत्येक मुलीला आपल्या विवाहात साहित्य असावे वाटते.पण परीस्थीतीनुसार शक्य नसते.अश्या परिस्थितीतील विवाहासाठी नांदेड येथील साईप्रसाद परीवाराचा आदर्शदायी उपक्रम हदगांव हिमायतनगर तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून बरडशेवाळा ता.हदगांव सोशल मिडीया ग्रुप, रयत प्रतिष्ठान, आशादिप ग्रुप कडुन राबवित अनेक कुटुंबातील विवाहासह अडचणीत आलेल्या अनेक कुटुंबाला मदत करीत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

किनवट तालुक्यातील कोठारी येथील अतीशय खडतर प्रवासाचा सामना करीत असलेल्या गरजु कुटुंबातील उषा विठ्ठल पिटलेवाड या मुलीच्या तोंडावर आलेल्या विवाहाला कन्यादान साहित्य



खरेदीसाठी आर्थिक अडचणीची माहिती हिमायतनगर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ सुर्यवंशी यांनी रयत प्रतिष्ठानला दिल्याने अध्यक्ष सटवाजी पवार जवळगावकर,राजु पांडे हदगांवकर सविताताई निमडगे पळसेकर प्रभाकर दहिभाते यांनी कुटुंबाला भेट देऊन खात्री करून अध्यक्ष सटवाजी पवार जवळगावकर यांनी रयत प्रतिष्ठान जवळगाव ग्रुप वर केलेल्या आवाहनाला दानशूर मंडळीच्या प्रतीसादाला हदगांव येथील सामाजिक कार्यकर्ते राजु पांडे यांनी दरवर्षीप्रमाणे याही आपल्या विवाह वाढदिवसानिमित्त अनाठायी खर्च न करता या कन्यादानात विशेष योगदान दिले. विवाह चार दिवस अगोदर रयत प्रतिष्ठानच्या माध्यमातून कन्यादान साहित्य घरपोच देत सामाजिक बांधीलकी जोपासली.तर

**हदगांव हिमायतनगर तालुक्यात रयत आशादिप सह सोशल मिडीया ग्रुप विविध अडचणीसह अनेक गरजु कुटुंबातील विवाहाला कन्यादान अन्नदान साहित्य देत जोपासलेल्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण भागात राबविण्यासाठी दानशूर मंडळीसह शक्य असेल त्यांनी पुढाकार घ्यावा.**

**रामभाऊ सूर्यवंशी हिमायतनगर**

हिमायतनगर भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष रामभाऊ सुर्यवंशी यांनी ही उपस्थित राहत या सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला .

यावेळी सटवाजी पवार जवळगावकर, सामाजिक कार्यकर्ते राजु पांडे हदगांवकर, प्रभाकर दहिभाते बरडशेवाळा, गजानन अनंतवार कवानकर ,शिवाजी काकडे गोकुदा ऊपस्थित होते. रयत प्रतिष्ठान च्या हादगाव हिमायतनगर तालुक्यात मदतीनतर या किनवट तालुक्यातील कोठारी येथील मदतीचे सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे.

## महात्मा फुले महाविद्यालयात जागतिक पुस्तक आणि कॉपीराईट दिन उत्साहात



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड :-** येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या ग्रंथ विभागाकडून दि. 23 एप्रिल रोजी जागतिक पुस्तक आणि कॉपीराईट दिन महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . या दिनानिमित्त महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. एस. बी. अडकिने , उपप्राचार्य प्रा.एस. बी.बळवंते यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला.सूत्रसंचलन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.प्रसाद जोशी तर आभार डॉ. अर्जुन गजमल यांनी केले.

महाविद्यालयाचे समृद्ध ग्रंथालय हे विद्यार्थी , प्राध्यापक आणि वाचक यांच्या सर्वांगीण विकासासाठी असते . ग्रंथालयाची गुणवत्ता त्यामध्ये उपलब्ध असणाऱ्या संदर्भ ग्रंथ , अभ्यासक्रमाची पुस्तके यावर अवलंबून असते . पुस्तक वाचताना वाचक हा ज्ञानपिपासू वृत्तीने ग्रहण करणारा असावा . विविध समारंभात भेटवस्तू देण्याऐवजी एखादे ग्रंथ भेट दिले तर वाचकांना एका नवीन विषयाची माहिती मिळते . ती माहिती आयुष्यभर पुरणारी शिदोरी आहे . असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले .

तसेच डॉ. संतोष शेंबाळे यांची राज्यस्तरीय करिअर कट्टा आणि ग्लोबल मराठी समितीच्या राज्यस्तरीय सदस्यपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल डॉ. अर्जुन गजमल , वैशाली पाटील , निर्गुण वटपलवाड यांनी प्रयत्न केले . याप्रसंगी प्राध्यापक , विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

## नळेगाव येथे अल फारुख उर्दू शाळेच्या शिक्षकांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न

**चाकुर:-**नळेगाव (ता. चाकूर) येथील अल फारुख उर्दू प्राथमिक शाळेचे जेष्ठ शिक्षक शेख



कासीम चाँदसाब आणि सौ. सय्यद नजमा बेगम अ. हमीदसाब हे दीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने शाळेच्यावतीने २६ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या सन्मानार्थ निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नजीब जागीरदार होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुखीम देशमुख यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इर्शाद पिरजादे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक वहाब जागीरदार यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक कादिर जागीरदार यांनी केले. या वेळी समद शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना शेख कासीम यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवाभिमानाचा उल्लेख करत शाळा, संस्था व विद्यार्थ्यांचे आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष नजीब जागीरदार यांनी शेख कासीम व सय्यद नजमा बेगम यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात शेख मुजीब, हाश्मी मोईनोद्दीन, सय्यद इस्माईल, लायक सोदागर, इल्यास शेख, मुंजेवार बाबू, हुसेन घोरवाडे, खुरेशी साहेबलाल, शेख युनूस, नुरोद्दीन तांबोळी, सय्यद फय्याज, उस्मान इनामदार, जमील पटेल, महेबूब शेख, रफीख मणियार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# भगवान परशुराम जन्मोत्सव अत्यंत साधेपणाने साजरा होणार !

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तालुका हदगाव जिल्हा नांदेड तर्फे दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने या वर्षी सुद्धा विविध धार्मिक सामाजिक उपक्रम राबवून जन्मोत्सव सोहळा साजरा करण्याचे आयोजन झाले होते.मात्र दिनांक २२ एप्रिल रोजी जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे पाक पुरस्कृत अतिरेक्यांनी निरपराद हिंदू तरुणांवर व भारतीय व्यक्तींवर गोळीबार करीत त्यांची त्यांची जात विचारून अत्यंत क्रूरपणे हत्या केली. ही



घटना अत्यंत निंदनीय तथा हिंदू समाजावर आघात करणारी आहे. त्यामुळे यंदाचा २९ एप्रिल भगवान परशुराम जन्मोत्सव हा साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तालुका हदगाव तर्फे घेण्यात आला आहे.

श्री भगवान परशुराम जन्मोत्सवा निमित्ताने हदगाव शहरातून काढण्यात येणारी भव्य शोभायात्रा इतर कार्यक्रम या निंदनीय घटनेमुळे रद्द करण्यात आली आहे.

यावर्षी २९ एप्रिल संध्याकाळी पाच वाजता श्री सत्य गणपती मंदिरा समोर हदगाव तालुक्यातील

**पहलगाम घटनेमुळे सर्व कार्यक्रम रद्द**

सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन भगवान परशुरामाचे प्रतिमेचे पूजन करून परशुराम जन्मोत्सव साजरा करावा तसेच या भ्याड हल्ल्याचा निषेध करावा असे ठरले आहे हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व बांधवां सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हुस्सा येथे डॉ.आंबेडकर जयंती साजरी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नायगाव प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे हुस्सा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही परमपूज्य विश्वरत्न भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती विविध उपक्रमाने दि. २६ रोजी येथील बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे.

प्रारंभी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, सत्यशोधक महात्मा फुले, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, संत गाडगे महाराज, सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ साठे, यांच्या प्रतिमेचे पूजन करून पंचशील अष्टगाथा यांचे पठण करून पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण हुस्सा नगरीचे सरपंच रमेश पाटील हंबर्डे यांच्या हस्ते संपन्न झाले आहे.आणि ठीक 5 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली आहे.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रमेश रामराव पाटील हंबर्डे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून साहित्यिक व पत्रकार माधव बैलकवाड, युवा कार्यकर्ते सुरज पाटील शिंदे, नंदकिशोर हंबर्डे, मधुकर हंबर्डे आदी उपस्थित होते.


**कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप रमेश पाटील हंबर्डे यांनी केले आहे. तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार अशोक वाघमारे यांनी केले तर आभार अविनाश वाघमारे यांनी मांडले आहे.याप्रसंगी गावातील महिला व पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.**

यावेळी गावातील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर व त्यांच्या कार्याबद्दल आपली भाषणं केली आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भीम जयंती मंडळाच्या वतीने वाटप करण्यात आले आहे. यावेळी पत्रकार माधव बैलकवाड यांनी बोलताना म्हणाले की समाजाने जयंती ही विचारांची केली पाहिजे जयंतीसाठी अतिरिक्त खर्च टाळून समाजातील विद्यार्थ्यांसाठी जयंतीच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य साठी खर्च करावा तरच समाजातील विद्यार्थी भविष्य काळाचे भवितव्य ठरणार आहेत. डॉ. बाबासाहेब यांना अनेकांनी छळलं त्रास दिला पण ते कधीही डगमगले नाहीत मोठ्या जिद्दीने व चिकाटीने सामाजिक अमुलाग्र बदल घडून आणून समाजात समता बंधुता एकात्मता रुजविले आहे. म्हणूनच आज समाज स्वाभिमानाने जगतो, आजचे राजकारण किंवा नेता आदर्श राहिला नाही संविधान धोक्यात येत आहे तेव्हा समाजाने वज्रमूठ बांधली पाहिजे असेही बैलकवाड यांनी म्हणाले आहे.

यावेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष संदीप गायकवाड मारुती गायकवाड उत्तम गायकवाड प्रकाश गायकवाड उमेश गायकवाड गौतम भगतकर गौतम गायकवाड माधव गायकवाड दिगंबर धनकवाड नामदेव भगतकर शंकर वाघमारे पांडुरंग वाघमारे चंद्रकांत वाघमारे आनंदा वाघमारे किशोर वाघमारे अविनाश वाघमारे दत्ता तेलंगे लक्ष्मण तेलंगे भाऊराव तेलंगे भाऊराव तेलंग उपस्थित होते.

# बाबाराव डोईजड यांना दिव्य साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने गौरव

## गुंफण या काव्यसंग्रहाचे प्रकाशन शिर्डीत होणार



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**धुळे -** साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी.फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार बुलढाणा जिल्ह्यातील शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे बाबाराव दत्तात्रय डोईजड यांना घोषित झाला असून त्यांना शिर्डीत हा भव्य व दिव्य पुरस्कार दि. ३ मे २०२५ रोजी शनिवारी मान्यवरांच्या हस्ते हॉटेल शांतीकमलच्या सभागृहात देण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यात पुर्ण महाराष्ट्र राज्यातील मान्यवर व्यक्तींना हा मानाचा,सन्मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा महाराष्ट्र राज्यातील पहिलाच राष्ट्रीय पातळीवरील साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार वितरीत करण्यात येणार आहे.

विविध करमणुकीचे सुध्दा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. हा पुरस्कार सोहळा सकाळीच १०.ते दुपारी.३.वाजेपर्यंत चालणार आहे. बाबाराव डोईजड यांनी सामाजिक क्षेत्रात व माध्यमिक विद्यालयाच्या साहित्य व शैक्षणिक उपक्रमात विशेष योगदान दिलेले आहे,त्यामुळेच त्यांचा हा गौरव होत आहेत.चंद्रमा फाऊंडेशन प्रस्तुत. कलाकार स्टुडिओ व अभिनय अकादमी चेंबूर. मुंबई आणि प्रसिध्द हॉटेल व्यवसायिक व समाज सेवक मा.किशोरजी कालडा शेठ संगमनेर. या दोघांच्या सौजन्याने देण्यात येणार आहे.या भव्य व दिव्य पुरस्कार सोहळ्यास सिने स्टार अभिनेत्री मानसी नाईक,प्रसिद्ध सिने अभिनेते.मिलिंद दास्ताने,प्रसिध्द हॉटेल व्यवसायिक व समाज सेवक.श्री.किशोरजी कालडा शेठ संगमनेर,तसेच प्रसिद्ध असलेले संगमनेर कॉलेज चे प्राचार्य डॉ.अरुण गायकवाड व प्रसिध्द समाजभूषण. श्री.उत्तम काका घोगरे पाटील लोणी प्रवरा,तसेच अभिनेता व मिमिक्री कार. श्री.अशिष सातपुते,मुंबई व शिक्षण सम्राट श्री.दत्ता वाणी संस्थापक तसेच प्रसिद्ध चित्रपट निर्माता व दिग्दर्शक श्री.अल्ताफ शेख ,पुणे हे सर्व मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल बाबाराव डोईजड यांचे विविध क्षेत्रातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.